06.03.2020 प्रभात:मुरली ओम शांती बापदादा मधुबन

**"गोड मुलांनो,या जुन्या दुनिया मध्ये अल्पकाळ क्षणभंगुर सुख आहे,हे सोबत येऊ शकत नाही,अविनाश ज्ञान रत्न सोबत येतात,त्यामुळे अविनाशी कमाई जमा करा"**

**प्रश्न:-** बाबांच्या शिक्षणामध्ये तुम्हाला कोणती विद्या शिकवली जात नाही?

**उत्तर:-** भूत विद्या.कोणाच्या मनातील विचार जाणने,ही भूत विद्या आहे.तुम्हाला ही विद्या शिकवली जात नाही.बाबा काही मनातील संकल्प जाणत नाहीत.ते तर जानी जाणनहार म्हणजे ज्ञानाचे सागर आहेत.बाबा तुम्हाला आत्मिक शिक्षण देण्यासाठी येतात.ज्या शिक्षणाद्वारे तुम्हाला २१ जन्मा साठी विश्वाची राजाई मिळते.

**ओम शांती.** भारतामध्येच भारतवासी गायन करतात,आत्मा आणि परमात्मा वेगळे राहिले फार दिवस.आता मुलं जाणतात,आम्हाला पिता परमपिता परमात्मा शिकवत आहेत.आपला परिचय देत आहेत आणि सृष्टीच्या आधी मध्य अंतचा परिचय देत आहेत.कोणाला तर पक्का निश्चय आहे,कोणी कमी समजतात, क्रमानुसार तर आहेत ना.मुलं जाणतात आम्ही जीव आत्मे परमपिता परमात्म्याच्या सन्मुख बसले आहोत.आत्मा आणि परमात्मा वेगळे राहिले फार दिवस असे गायन आहे.आता मूळवतन मध्ये जेव्हा आत्मे आहेत,तर वेगळी राहण्याची गोष्टच नाही.या सृष्टी वरती आल्यामुळे,जेव्हा जीवात्मा बनतात,तर परमात्मा पिता पासून सर्व आत्मे वेगळे होतात.परमपिता परमात्मा पासून वेगळे होऊन या सृष्टी वरती अभिनय करण्यासाठी,भूमिका वठवण्यासाठी येतात.अगोदर तर अर्था शिवाय असेच गीत म्हणत होते.आता तर बाबा सन्मुख समजावत आहेत.परमपिता परमात्मा पासून वेगळे झालो आहोत,येथे येऊन भूमिकात वठवत आहोत.सर्वप्रथम वेगळे झाले म्हणून शिव बाबा पण प्रथम तुम्हालाच भेटतात.तुमच्यासाठी बाबांना यावे लागते.कल्पा पूर्वी पण या मुलांना शिकवले होते,जे परत स्वर्गाचे मालक बनले.त्यावेळेस दुसरा कोणता खंड नव्हता.मुलं जाणतात आम्ही आदी सनातन देवी देवता धर्माचे होतो,ज्याला दैवी घराने म्हटले जाते.प्रत्येकाला आपला धर्म असतो.धर्मामध्ये ताकत आहे असे म्हटले जाते.तुम्ही मुलं जाणता हे लक्ष्मी-नारायण खूप शक्तिशाली होते.भारत वासी आपल्या धर्माला जाणत नाहीत.कोणाच्याही बुद्धीमध्ये येत नाही बरोबर भारता मध्ये,यांचा धर्म होता. धर्माला न जाणल्यामुळे अधार्मिक बनले आहेत.देवता धर्मा मध्ये आल्यामुळे तुमच्या मध्ये खूप शक्ती राहते.तुम्ही लोह युगी डोंगराला उठवून सुवर्ण युगी बनवतात.भारताला सोन्याचा डोंगर बनवतात.तेथे तर सर्व खाणी मध्ये सोने भरपूर असते.सोन्याचे डोंगर असतील, परत ते दिसुन येतील.सोन्याला गाळून त्याच्या विटा बनवतात.इमारत बनवण्या साठी विटा तर लागतात.माया मच्छिंद्र चा पण खेळ दाखवतात ना.असे म्हणतात ध्याना मध्ये गेल्या नंतर सोन्याच्या विटा ची झोळी भरून घेतली,ध्यानातून खाली आले तर हातामध्ये काहीच नाही.तुमचे पण असेच होते.यालाच दिव्यदृष्टी म्हटले जाते.यामध्ये काहीच ठेवले नाही.नवविध भक्ती खूप करतात.ती भक्ताची माळ च वेगळी आहे.ही ज्ञानाची माळ वेगळी आहे. रुद्र माळ आणि विष्णूची माळ आहे ना.परत आहे भक्तीची माळ.आता तुम्ही राजाई घेण्यासाठी शिक्षण घेत आहात. तुमचा बुद्धी योग शिक्षकांच्या सोबत आणि राजाई सोबत आहे.जसे कॉलेजमध्ये शिकवतात,तर शिक्षका सोबत बुध्दी योग राहतो.वकील मुलांना शिकून परत आपल्या सारखे बनवतात.हे बाबा स्वता: तर बनत नाहीत.येथे हे आश्चर्य आहे.तुमचे आत्मिक शिक्षण आहे.तुमचा बुद्धी योग बाबाच्या सोबत आहे.त्यांनाच ज्ञानाचे सागर म्हटले जाते.तुमचे हे आत्मिक शिक्षण आहे.जानी जानन हार चा,हा अर्थ नाही की,ते सर्वांच्या मनातील जाणतात,की त्यांच्या मनामध्ये कोणते विचार चालतात.ते जे मनातील जानणारे असतात,ते सर्व ऐकवतात,त्याला भूतविद्या म्हटले जाते.येथे तर बाबा मनुष्यापासून देवता बनण्याचे शिक्षण देत आहेत.गायन पण आहे मनुष्यापासून देवता बनण्यासाठी वेळ लागत नाही.आता तुम्ही मुलं समजता आम्ही ब्राह्मण बनलो आहोत,परत दुसऱ्या जन्मात देवी देवता बनू.आदी सनातन देवी देवता धर्माचेच गायन आहे.ग्रंथांमध्ये तर अनेक गोष्टी लिहिल्या आहेत.हे तर बाबा बसून तुम्हाला प्रत्यक्षात शिकवत आहेत. भगवानुवाच- भगवान तर ज्ञानाचे सागर, सुखाचे सागर,शांतीचे सागर आहेत.तुम्हा मुलांना वारसा देतात.हे शिक्षण २१ जन्मासाठी आहे,म्हणून चांगल्या रितीने अभ्यास करायचा आहे. हे आत्मिक शिक्षण बाबा एकाच

वेळेस येऊन शिकवतात,त्याद्वारे नवीन दुनियेची स्थापना करतात.नवीन दुनिये मध्ये,या देवी देवतांचे राज्य होते.बाबा म्हणतात,मी ब्रह्मा द्वारा आदी सनातन देवी देवता धर्माची स्थापना करत आहे.जेव्हा हा धर्म होता तर,दुसरा कोणताच धर्म नव्हता.आता बाकी सर्व धर्म आहेत म्हणून त्रीमूर्ती वरती पण,तुम्ही समजून सांगता,ब्रह्मा द्वारे एका धर्माची स्थापना होते.आता तो धर्म नाही.गायन पण करतात मज निर्गुण मध्ये कोणते गुण नाहीत,तुम्हीच दया करा.आमच्या मध्ये कोणतेच गुण नाहीत,म्हणून बुद्धी ईश्वरा कडे चालली जाते,त्यांनाच दयावान म्हटले जाते. बाबा मुलांचे दुःख दूर करण्यासाठी च येतात आणि त्यांना शंभर टक्के सुख देतात.खूपच दया करतात.तुम्ही समजतात आम्ही बाबा जवळ आलो आहोत,तर बाबांकडून पूर्णपणे सुख घ्यायचे आहे.ते सुखधाम आहे आणि हे दुखधाम आहे. या चक्राला पण चांगल्या रीतीने समजायचे आहे.शांतीधाम सुखधामची आठवण करा तर,अंत काळ चांगला जाईल आणि परत सुरुवात पण चांगली होईल.शांतीधाम ची आठवण कराल,तर जरूर शरीर सोडावे लागेल,तेव्हाच आत्मे शांति धाम मध्ये जातील.एक बाबांच्या शिवाय दुसऱ्या कोणाची आठवण यायला नको.एकदम बुद्धीची लाईन स्पष्ट पाहिजे.एका बाबांची आठवण केल्यामुळे मनामध्ये खुशीचा पारा चढेल.जुन्या दुनिया मध्ये अल्प काळाचे क्षणभंगुर सुख आहे.हे सोबत येऊ शकत नाही.सोबत तर हेच अविनाश रत्न चालतील.या ज्ञान रत्नाची कमाईच सोबत येते,ज्यामुळे तुम्ही २१ जन्म त्याचे प्रारब्ध भोगाल. होय,विनाशी धन पण सोबत त्यांचेच येते,जे बाबांना मदत करतात.बाबा आमच्या कवड्या घेऊन आम्हाला सतयुगा मध्ये महल द्या.बाबा कवड्यांच्या ऐवजी खूप रत्न देतात.जसे अमेरिकन लोक असतात,पुष्कळ पैसे देऊन जुन्या वस्तू खरेदी करतात.जुन्या वस्तूचे मनुष्य खूप पैसे घेतात.अमेरिकन लोकां कडुन पाई पैशाच्या गोष्टीचे हजार रुपये घेतील.बाबा पण खूप चांगले ग्राहक आहेत.भोलानाथ चे गायन आहे ना.मनुष्यांना हे पण माहीत नाही,ते तर शिव शंकराला एकच म्हणतात, त्यांच्यासाठी पण म्हणतात झोळी भरा. आता तुम्ही मुलं समजता आम्हाला ज्ञान रत्न मिळत आहेत,त्याद्वारे आमची झोळी भरत आहे.ते बेहदचे पिता आहेत.ते तर शंकरासाठी म्हणतात आणि परत दाखवतात धतुरा खात होते,भांग पीत होते. अनेक गोष्टी बसून लिहल्या आहेत.तुम्ही मुलं सद्गती साठी शिक्षण घेत आहात. हे शिक्षण आहेच बिलकुल शांती मध्ये राहण्यासाठी.शिवरात्रीला डेकोरेशन,लाईट इ. लावतात, देखावा करतात ते पण यासाठी की,मनुष्य विचारतील तुम्ही शिवजयंती म्हणजेच महाशिवरात्री धुमधडाक्याने का साजरी करतात? शिवबाबा भारताला धनवान बनवतात ना. लक्ष्मी नारायण ला स्वर्गाचे मालक कोणी बनवले, हे तुम्ही जाणतात.लक्ष्मीनारायण अगोदरच्या जन्मां मध्ये कोण होते? अगोदरच्या जन्मांमध्ये जगदंबा ज्ञान ज्ञानेश्वरी होती,परत तीच राज राजेश्वरी बनते.आता कोणाचे मोठे पद आहे? तसे तर हे स्वर्गाचे मालक आहेत.जगदांबा कुठली मालक होती? त्यांच्याजवळ का जातात? ब्रह्माला पण १०० भुजा,२००भुजा,१००० भुजा दाखवतात.जितकी मुलं असतात तेवढ्या भुजा वाढत जातात.जगदंबा ला पण लक्ष्मी पेक्षा जास्त भुजा दिल्या आहेत. त्यांच्याजवळ जाऊन सर्व काही मागतात. अनेक इच्छा ठेवून जातात,मुलगा पाहिजे, हे पाहिजे.लक्ष्मीच्या जवळ कधीच अशा इच्छा घेऊन जात नाहीत.ती तर फक्त धनवान आहे.जगदंबा कडून तर स्वर्गाची बादशाही मिळते,हे पण कोणालाच माहिती नाही.जगदंबा पासून काय मागायला पाहिजे?हे तर शिक्षण आहे ना.जगत अंबा काय शिकवते?राजयोग.यालाच बुद्धीयोग म्हटले जाते.तुमची बुध्दी दुसऱ्या ठिकाणा वरून काढून,एका बाबांशी लागते.बुद्धी तर अनेक ठिकाणी जाते ना.आता बाबा म्हणतात माझ्यासोबत बुद्धी लावा,नाहीतर विकर्म विनाश होणार नाहीत,म्हणून बाबा फोटो काढण्या साठी मना करतात. हा देह तर ब्रह्माचा आहे ना.

बाबा स्वतः दलाल बणुन म्हणतात,आता तुमचा तो साखरपुडा कॅन्सल आहे.काम चिते वरुन उतरुन,ज्ञान चितेवरती बसा.काम चिता वरुन उतरा.स्वताःला आत्मा समजुन आठवण करा तर विर्कम विनाश होतील. दुसरे कोणी मनुष्य असे म्हणू शकत नाहीत.मनुष्याला भगवान पण म्हटले जात नाही.तुम्ही मला जाणता बाबाच पतित पावन आहेत.तेच येऊन काम चिता वरून उतरून,ज्ञान चिता वरती बसवतात.ते आत्मिक पिता आहेत.ते यांच्या द्वारे म्हणतात,तुम्ही आत्मा आहात, दुसऱ्यांना पण हे समजून सांगत रहा.बाबा म्हणतात मनमनाभव.हे म्हटल्यामुळे स्मृती येईल. जुन्या दुनिया चा विनाश समोर उभा आहे.बाबा समजवतात ही महाभारी महाभारताची लढाई आहे.ही लढाई तर परदेशात पण होते,याला महाभारत लढाई का म्हणतात? भारतामध्ये यज्ञ रचलेला आहे यादवारेच विनाशाच्या ज्वाळा निघतील.तुमच्यासाठी तर नवीन दुनिया पाहिजे,गोड मुलांनो जुन्या दुनियेचा जरूर विनाश व्हायला पाहिजे. तर या लढाईचे मूळ येथून निघते.या रुद्र ज्ञानयज्ञा द्वारे महाभारी लढाईची विनाश ज्वाळा प्रज्वलित झाली होती.जरी ग्रंथामध्ये लिहिले आहे परंतु कोणी म्हटले हे जाणत नाहीत.आता बाबा नविन

दुनियेसाठी समजवत आहेत.आता तुम्ही राज्य घेतात परत तुम्ही देवी-देवता बनतात.तुमच्या राज्यांमध्ये दुसरे कोणी नसतात.

आसुरी दुनियाचा विनाश होतो.बुद्धीमध्ये आठवणीत राहिले पाहिजे, काल आम्ही राज्य केले होते.बाबांनी राज्य दिले होते, परत ८४ जन्म घेत आलो.आता बाबा परत आले आहेत.तुम्हा मुलांमध्ये हे ज्ञान तर आहे ना.बाबांनी हे ज्ञान दिले आहे,जेव्हा देवी देवता धर्माची स्थापना होते,तर बाकी साऱ्या आसुरी दुनियाचा विनाश होतो.या गोष्टी बाबा, ब्रह्मा द्वारे समजवत आहेत. ब्रह्मा शिव बाबाचा मुलगा आहे.विष्णूचे रहस्य पण समजवले आहे की,ब्रह्माच विष्णू आणि विष्णूच ब्रह्मा बनतात.तुम्ही समजले आहात की आम्ही ब्राह्मणच परत देवता बनतो,परत ८४ जन्म घेऊ.हे ज्ञान देणारे एक बाबाच आहेत.दुसऱ्या कोणत्या मनुष्या द्वारे हे ज्ञान मिळू शकत नाही. यामध्ये सारे बुद्धी ची गोष्ट आहे.बाबा म्हणतात दुसरी कडून बुद्धीचा योग काढुन टाका.बुद्धीच बिघडते.बाबा म्हणतात माझी आठवण करा,तर विर्कम विनाश होतील. गृहस्थ व्यवहारामध्ये खुशाल रहा,मुख्य उद्देश समोर आहे.तुम्ही जाणता आम्ही शिक्षण घेऊन लक्ष्मीनारायण सारखे बनू. तुमचे शिक्षण आहेच संगम युगा मधील. आता तुम्ही,ना या बाजूचे आहात,ना त्या बाजूचे.तुम्ही बाहेर आहात.बाबांना नावाडी पण म्हटले जाते.गायन पण आहे आमची नाव किनार्याला घेऊन जावा.या वरती एक गोष्ट पण आहे,काही चालायला लागतात काही थांबतात.आता बाबा म्हणतात मी या ब्रह्मा मुखाद्वारे तुम्हाला ज्ञान देतो.ब्रह्मा कोठून आले?प्रजापिता जरूर येथे पाहिजेत ना,यांना दत्तक घेतो त्यांचे नाव ठेवतो ब्रह्मा.तुम्हीपण ब्रह्मा मुख वंशावळ ब्राह्मण आहात.जे कलयुगा च्या शेवटी आहेत,तेच सतयुगाच्या सुरुवातीला येतील.तुम्हीच प्रथम बाबा पासून वेगळे होऊन,अभिनय करण्या साठी आले आहात.आपल्यामध्ये पण सर्व तर,असे म्हणणार नाहीत ना. हे पण माहिती होईल की कोण पूर्ण ८४ जन्म घेतात. या लक्ष्मी नारायणाची तर खात्री आहे ना. यांच्या साठीच गायन आहे,श्याम सुंदर. देवी-देवता सुंदर होत्या,सावळ्या पासून सुंदर बनतात.गावातील मुलगा बदलून सुंदर बनवतात.यावेळेस सर्व छोरा छोरी आहेत.ही बेहदची गोष्ट आहे,यांना कोणी जाणत नाहीत.बाबा खूपच चांगल्या प्रकारे समजून सांगतात.प्रत्येकासाठी सर्जन एकच आहे.हे अविनाशी सर्जन आहेत.

योगाला अग्नी म्हटले जाते,कारण योगाद्वारे आत्म्या मधील भेसळ निघून जाते.योग अग्नीद्वारे आत्मा तमोप्रधान पासून सतोप्रधान बनते.जर अग्नी थंड होतो तर,भेसळ निघत नाही.योगाला अग्नी म्हटले जाते.तुम्हाला खूप चांगल्या रीतीने समजावून सांगतो,तर धारणा पण व्हायला पाहिजे.अच्छा मनामनाभव या मध्ये थकायचे नाही.बाबांची आठवण करण्यास पण विसरून जातात.हे तर पतींचे पती आहेत,तुमचा ज्ञानाद्वारे खूप श्रृंगार करतात.दुसऱ्या कडून बुद्धी काढून,मज पित्याची आठवण करा.सर्वांचे एकच पिता आहेत.तुमची आता चढती कला,म्हणजे प्रगती होते,गायन पण आहे,चढती कला, तुझ्यामुळे सर्वांचे भले.बाबा सर्वांचे कल्याण करण्यासाठी येतात. अच्छा. गोड गोड फार वर्षानंतर भेटलेल्या मुलां प्रती मात पिता,बापदादाची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात.आत्मिक पित्याचा,आत्मिक मुलांना नमस्ते.

**धारणेसाठी मुख्य सारांश:-**

1. (१) बाबाच्या आठवणी द्वारे अपार सुखाचा अनुभव करण्यासाठी बुद्धीचा लाईन स्पष्ट पाहिजे. आठवण जेव्हा,अग्नीचे रुप घेईल,तेव्हाच आत्मा सतोप्रधान बनेल.
2. (२) बाबा कवडीच्या बदल्यात रत्न देत आहेत.अशा भोलेनाथ बाबा कडुन झोळी भरायची आहे.शांती मध्ये राहण्याचे शिक्षण घेऊन,सद्गती प्राप्त करायची आहे.

**वरदान:-** तीन प्रकारच्या विजयाचे पदक घेऊन घेणारे नेहमी विजयी भव.

विजयी माळे मध्ये नंबर घेण्या साठी प्रथम स्वता:वरती विजयी बना,परत सर्वा वरती विजय आणि परत प्रकृती वरती विजयी बना.जेव्हा या तीन प्रकारच्या विजयाचे पदक घ्याल,तेव्हाच विजय माळेचा मणी बनाल.स्वता: वरती विजयी बनाल,तेव्हा आपल्या व्यर्थ भाव, स्वभावाला श्रेष्ठ भाव,शुभ भावने द्वारे परिवर्तन करा.असे स्वतःवरती,जे विजय प्राप्त करतात,तेच दुसऱ्या वरती विजय प्राप्त करु शकतात.प्रकृती वरती विजय प्राप्त करणे म्हणजेच वातावरण आणि जड प्रकृतीच्या समस्या वरती विजयी बनणे.

**बोधवाक्य:-** स्वतःच्या कर्मेंद्रियावरती संपूर्ण राज्य करणारेच खरे राजयोगी आहेत.

||| ओम शांती |||

ओम शांती.